स्टेट बँकेचा नफा २४,११३ कोटींपुढे

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : देशातील सर्वात मोठी सरकारी बँक असलेल्या स्टेट बँकेचा एकत्रित निव्वळ नफा सरलेल्या जून तिमाहीत १३.७३ टक्क्यांनी वाढून २४,११३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मुख्य उत्पन्नातील सुधारणा आणि संभाव्य बुडीत कर्जांसाठी करावी लागणारी तरतूद कमी झाल्यामुळे ही वाढ साधता आली आहे.

बँकेचा निव्वळ नफा वार्षिक आधारावर १०.२३ टक्क्यांनी वाढून २१,१२१.२२ कोटी रुपये झाला. मागील वर्षीच्या याच कालावधीत (एप्रिल-जून) तो १९,१६०.४४ कोटी रुपये होता. एकूण कर्जांच्या वितरणात १८.६३ टक्क्यांची वाढ झाल्यामुळे बँकेचे मुख्य निव्वळ व्याज उत्पन्न सुमारे १५ टक्क्यांनी वाढून ४६,९९२ कोटी रुपयांवर पोहोचले, तर देशांतर्गत निव्वळ व्याज मार्जिन घसरून ३ टक्क्यांवर आले. मात्र, तिमाही-दर-तिमाही आधारावर बँकेला एनआयएम (निम) वाढवण्यात यश आले असून, त्यात ०.०७ टक्क्यांची वाढ झाली आहे. बँकेचे व्याज-व्यतिरिक्त उत्पन्न ९ टक्क्यांनी घसरून १५,२९३ कोटी रुपये झाले. याचे मुख्य कारण म्हणजे परकीय चलन किंवा डेरिव्हेटिव्ह्ज व्यवहारांतून मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली ७० टक्क्यांची घट हे होते. बँकेच्या ठेवींमध्ये ९.७३ टक्क्यांची वाढ झाली, तर कमी खर्चाच्या चालू आणि बचत खात्यांचा (कासा) हिस्सा वार्षिक आधारावर ०.१२ टक्क्यांनी कमी होऊन ३९.३६ टक्क्यांवर आला.

बँक आर्थिक वर्ष २०२७ मध्ये १४-१५ टक्के कर्ज वाढीचे उद्दिष्ट राखून आहे आणि १०-११ टक्के ठेव वाढीद्वारे याला वित्तपुरवठा करणे शक्य होईल.

एफसीएनआर-बी योजनेच्या सुरुवातीपासून बँकेने ६०० कोटी डॉलरचा निधी बँकेने उभारला आहे आणि सप्टेंबरमध्ये ही विशेष सुविधा बंद होईपर्यंत हा आकडा १,००० कोटी डॉलरपर्यंत नेणे शक्य होईल, असे बँकेचे अध्यक्ष सी. एस. सेट्टी म्हणाले. नवीन 'स्लिपेजेस' अर्थात कर्ज बुडीत खात्यात जाण्याचे प्रमाण ७,०४६ कोटी रुपये इतके होते. हे प्रमाण मागील वर्षीच्या याच कालावधीतील ७,९४५ कोटी रुपयांच्या तुलनेत कमी असले, तरी मार्च तिमाहीतील ५,५२१ कोटी रुपयांच्या तुलनेत मात्र खूपच जास्त होते. एकूण अनुत्पादित मालमत्तेचे प्रमाण ३० जून रोजी १.४७ टक्क्यांवर आले. ३१ मार्च रोजी हे प्रमाण १.४९ टक्के आणि मागील वर्षीच्या याच कालावधीत १.८३ टक्के होते. ३१ ते ८९ दिवसांपासून परतफेड न झालेली, परंतु अद्याप 'एनपीए' म्हणून वर्गीकृत न झालेली कर्जे मार्चमधील ३,३५० कोटी रुपयांवरून जूनच्या अखेरीस ४,१७४ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहेत. अनुत्पादित मालमत्तेसाठीची तरतूद जून तिमाहीत ३,३५९ कोटी रुपये इतकी होती. मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४,९३४ कोटी रुपयांच्या तुलनेत ती कमी असली, तरी मागील तिमाहीतील ३,१४० कोटी रुपयांच्या तुलनेत ती अधिक होती.

शुक्रवारच्या सत्रात स्टेट बँकेचा समभाग १.१२ टक्क्यांनी वधारून १,०९७.२० रुपयांवर स्थिरावला. तर सध्याच्या शेअरच्या बाजारभावानुसार बँकेचे १०.१२ लाख कोटींचे बाजारभांडवल आहे.

स्वतंत्र 'ब्रिक्स' चलनाची कल्पना भारताला अमान्य

पीटीआय, जयपूर

रशिया, ब्राझील, चीनचा समावेश असलेल्या 'ब्रिक्स' देशांच्या स्वतंत्र चलनाच्या बाजूने भारत नाही आणि अशा कोणत्याही योजनेचे समर्थन करत नाही, अशी स्पष्ट भूमिका केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी शुक्रवारी येथे मांडली.

गेल्या काही वर्षांपासून चीन आणि रशिया यांसारखे सदस्य देश अमेरिकी डॉलरला पर्याय म्हणून किंवा स्वतंत्र 'ब्रिक्स चलन' निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अशा पार्श्वभूमीवर गोयल यांनी भारताची म्हणून स्पष्ट केलेली भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. वर्ष २०२४ मध्ये, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांना अमेरिकी डॉलरची जागा घेण्याच्या कोणत्याही हालचालीविरोधात इशारा दिला आहे.

सेंट्रल बँकेतर्फे पुण्यातील मेळाव्यातून १०६ कोटींच्या कर्जांना मंजुरी

पुणे : आघाडीची सरकारी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पुणे क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने 'मेगा एमएसएमई क्रेडिट आऊटरीच' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भोसरी येथील 'क्वालिटी सर्कल एक्सिलन्स सेंटर' येथे ७ ऑगस्टला हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या विशेष मोहिमेअंतर्गत १०६ कोटी रुपयांच्या कर्जांना तत्त्वतः आणि प्रत्यक्ष कर्जमंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रातील उद्योजक आणि ग्राहकांना बँकेच्या विविध कर्ज योजना तसेच वित्तीय सुविधांची माहिती देणे आणि पात्र उद्योजकांना आवश्यक आर्थिक साहाय्य वेळेत उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई कॉर्पोरेट कार्यालयाच्या मुख्य महाव्यवस्थापिका कविता ठाकूर होत्या. कार्यक्रमादरम्यान बँक अधिकाऱ्यांनी एमएसएमई क्षेत्रासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध वित्तीय योजना, सवलती व उद्योग प्रोत्साहन उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. विविध सामाजिक सुरक्षा योजना, री-केवायसी/सी-केवायसी, पीएम सूर्य घर योजना आणि ई-एमएसएमई ॲडव्हायझरी सर्व्हिसेस यांसारख्या महत्त्वाच्या उपक्रमांबद्दल मार्गदर्शन आणि त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी अजय कुमार सिंह आणि पुणे क्षेत्रीय प्रमुख राजेश मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय, पिंपरी-चिंचवड भारतीय लघु उद्योगाचे अध्यक्ष दीपक फल्ले, येथील आयआयबी इन्स्टिट्यूटचे संचालक महेश लाहोरे आणि पंचजन्य मोटर्सचे राजेश वानखेडे हे विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित होते.

टीजेएसबी बँकेतर्फे सायबर सुरक्षा जनजागृती

ठाणे: डिजिटल बँकिंगचा वाढता वापर आणि वाढत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर, टीजेएसबी सहकारी बँकेतर्फे १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'सायबर सुरक्षा जनजागृती अभियान' यशस्वीपणे राबवण्यात आले.

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या ७ राज्यांमधील बँकेच्या सर्व १७२ शाखांमध्ये हे अभियान पार पडले. बँकेने ग्राहकांच्या आर्थिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, ग्राहकांनी डिजिटल व्यवहार करताना अधिक सतर्क राहावे या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत मुख्यत्वे ज्येष्ठ नागरिक आणि तरुण वर्ग या दोन घटकांवर विशेष भर देण्यात आला. या अभियानांतर्गत बँकेच्या प्रत्येक शाखेत ग्राहकांशी थेट संवाद साधून सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांची सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये फिशिंग ई-मेल, बनावट वेबसाईट, ओटीपी व यूपीआय फसवणूक, क्यूआर कोड स्कॅम, केवायसी अपडेट संदेश तसेच मोबाईल व इंटरनेट बँकिंगचा सुरक्षित वापर कसा करावा, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या मोहिमेदरम्यान बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांना सायबर गुन्हेगारीचे गंभीर परिणाम समजावून सांगितले.

ई-वाहनांची विक्रमी विक्री

नवी दिल्ली : देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) विक्रीने सरलेल्या जुलै महिन्यात नवीन विक्रम नोंदविला. तब्बल ३ लाखांहून अधिक 'ईव्हीं'ची या महिन्यात विक्री झाली असून, विकले गेलेल्या प्रत्येक आठपैकी ते एक वाहन राहिल्याचे 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल्स डिलर्स असोसिशएन'ने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीने स्पष्ट केले.

याआधी याच वर्षी जूनमध्ये ईव्हींच्या मासिक विक्रीचा २ लाख ४ हजार ३६२ असा विक्रमी स्तर नोंदविण्यात आला होता. गेल्या वर्षीच्या जून महिन्यातील १ लाख ८ हजार ५१६ विक्रीच्या तुलनेत त्यात ६३ टक्के वाढ झाली होती. याचबरोबर एकूण वाहनांमध्ये ईव्हींचे प्रमाण १२ टक्क्यांवर पोहोचले होते.

आता जुलैमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीने नवीन विक्रम नोंदविला आहे. वार्षिक तुलनेत जुलैमध्ये प्रवासी ईव्ही चारचाकींची विक्री ८३ टक्क्यांनी वाढून ३२ हजार ९२८ झाली आहे. याचवेळी इलेक्ट्रिक तीनचाकींच्या विक्रीत २५ टक्के वाढ होऊन ती ८७ हजार ५५ वर पोहोचली आहे. तर, इलेक्ट्रिक वाणिज्य वाहनांच्या विक्रीत १६८ टक्के वाढ होऊन ती ३,५५६ झाली आहे, असे असोसिशएनने म्हटले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका

शिक्षण विभाग

जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांकरिता 'शिक्षण सेवक' या संवर्गातील पुढीलप्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र शासनाच्या 'पवित्र पोर्टल' द्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	माध्यम	पदाचे नाव	एकूण रिक्त पदे	मानधन
१	मराठी	शिक्षण सेवक	५२५	१६०००/–
२	इंग्रजी	शिक्षण सेवक	३५२	१६०००/–
३	चित्रकला (संवर्ग)	शिक्षण सेवक	१०	१६०००/–
४	संगीत (संवर्ग)	शिक्षण सेवक	४८	१६०००/–
एकूण			९३५	

वरील पदांकसाठीची जाहिरात, सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील, शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती इत्यादी बाबतच्या सविस्तर माहितीसाठी व इतर महत्त्वाच्या सूचनांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. शासनाच्या पवित्र पोर्टलवर नमूद 'उमेदवारांसाठी प्राधान्यक्रमाबाबत सर्वसाधारण सूचना' मधील अनुक्रमांक ३१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अटी व शर्तीसह उपलब्ध आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवरील जाहिरातीचे कृपया अवलोकन करून शासनाच्या पवित्र पोर्टलमार्फत अर्ज सादर करण्यात यावेत.

अर्ज करण्याचा कालावधी :– दि. ०६.०८.२०२६ ते ११.०८.२०२६

सही/–
शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका

पीआरओ/१०५३/एडीव्ही/२०२६–२७

झाडे लावा, झाडे जगवा.

---

pnb Housing Finance Limited
Ghar ki Baat

परिशिष्ट-IV-A – अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालयः 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली- 110001, फोन्सः 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

शाखेचा पत्ताः कार्यालय क्र. 203, दुसरा मजला, सिटी वन मॉल कमर्शियल कॉम्प्लेक्स, पिंपरी, पिंपरी चिंचवड – 411018, महाराष्ट्र.
शाखेचा पत्ताः सहावा मजला, कॉन्क्लेव्ह बिल्डिंग, प्राईड हॉटेल च्या मागे, शिवाजीनगर, पुणे 411005.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. **विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन कज्जे (के)
HOU/PM/1119/757448 स्वप्नील बाळासाहेब चौधरी / कल्पना बी चौधरी / रोहित बाळासाहेब चौधरी. शाखाः पिंपरी चिंचवड	रु. 16,02,028.31 दि. 14.06.2022 रोजी नुसार	प्रत्यक्ष	विंग ई, तिसरा मजला, फ्लॅट क्र. 308, हॅपी सिटी - वराळे, सर्व्हे क्र. 47पी आणि 48पी, हिंदुस्तान पेट्रोलियम च्या समोर, वराळे फाटा, गाव वराळे, तालुका मावळ, पुणे, महाराष्ट्र 410507	रु. 16,65,000	रु. 1,66,500	09.09.2026	रु. 10,000	19.08.2026 दु. 12:00 ते दु. 4:00	10.09.2026 दु. 2:00 ते दु. 3:00	निरंक/ज्ञात नाही
NHL/PM/0719/731151 जितू बलरामदास चटलानी / नीता दत्तात्रय घोलप, शाखा : पिंपरी चिंचवड	रु. 35,36,564.84 दि. 15.04.2025 रोजी नुसार	प्रत्यक्ष	कार्यालय, दुसरा मजला, 299-जी, 93 अव्हेन्यू, स. क्र. 93ए/1ए/2, 93ए/2, 93ए/3 आणि 93ए/4, गाव वानवडी, तालुका हवेली, पुणे - 411022, महाराष्ट्र	रु. 32,82,000	रु. 3,28,200	09.09.2026	रु. 10,000	18.08.2026 दु. 12:00 ते दु. 4:00	10.09.2026 दु. 2:00 ते दु. 3:00	निरंक/ज्ञात नाही
HOU/PUN/0618/539800 नीलेश रामदास गाजरे / चारुशीला नीलेश गाजरे, शाखा : पुणे	रु. 6,45,833.93 दि. 17.06.2024 रोजी नुसार	प्रत्यक्ष	सिंगल बिल्डिंग, तिसरा मजला, फ्लॅट क्र. 304, प्लॅटिनम ब्लिस, गट क्र. 707, मरकळ, पुणे, महाराष्ट्र - 412105	रु. 7,68,000	रु. 76,800	09.09.2026	रु. 10,000	20.08.2026 दु. 12:00 ते दु. 4:00	10.09.2026 दु. 2:00 ते दु. 3:00	निरंक/ज्ञात नाही
HOU/WRJE/1018/597222 अंकुश मच्छिंद्र पिसे / रेखा अंकुश पिसे, शाखा : पुणे	रु. 26,73,984.49 दि. 14.10.2025 रोजी नुसार	प्रत्यक्ष	बिल्डिंग डी, दुसरा मजला, फ्लॅट क्र. 207, आपलं घर मोशी अॅनेक्स फेज I, गट क्र. 184, 187, 454, 456, 458 आणि 460, गाव खराबवाडी, पुणे, महाराष्ट्र- 410501.	रु. 27,15,000	रु. 2,71,500	09.09.2026	रु. 10,000	22.08.2026 दु. 12:00 ते दु. 4:00	10.09.2026 दु. 2:00 ते दु. 3:00	निरंक/ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. **(1)** आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती – गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेलः auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाणः– पिंपरी चिंचवड, पुणे. दिनांकः– 08.08.2026
स्वा./– प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

पुणे महानगरपालिका

समाज विकास विभाग,

जाहिर प्रकटन, सन २०२६–२०२७

पुणे महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या व सन २०२६ मध्ये इ. १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत आणि सन २०२६ मध्ये इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे.

एका शैक्षणिक वर्षासाठी जास्त अर्ज आल्यास पुणे महानगरपालिकेने अर्थसंकल्पातील वरील योजनेसाठी तरतूद केलेल्या रक्कमेतून समान रक्कम किंवा इ. १० वी करिता रक्कम रू. १५०००/- व इ. १२ वी करिता रक्कम रु. २५०००/- अर्थसहाय्य देणे असे योजनेचे स्वरूप आहे.

सदरचे अर्थसहाय्य हे उपलब्ध रक्कम व प्राप्त अर्ज यांचा विचार करून देणेत येणार आहे. इ. १० वी व इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गत खालील नियम व अटींची पुर्तता करणारया विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज ऑनलाईन पद्धतीने पुणे महानगरपालिकेच्या dbt.pmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	तपशील
१	भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजना	१. खुल्या गटातील विद्यार्थ्यांना सन २०२५ (फेब्रुवारी-मार्च) या शैक्षणिक वर्षात इ. १० वी व इ. १२ वी मध्ये कमीत कमी ८० % गुण मिळणे आवश्यक आहे. २. पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी /रात्रशाळेतील विद्यार्थी/ मागासवर्गीय विद्यार्थी यांना किमान ७०% गुण आवश्यक. ३. ४०% च्या पुढील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५५% गुण, कचरावेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणाऱ्या तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटित कष्टकरी कामगारांच्या मुलांना किमान ६५% गुण असणे आवश्यक आहे. ४. अंध विद्यार्थी इ.१० वी किंवा इ.१२ वी मध्ये उत्तीर्ण झाल्यास टक्केवारी न पाहता लाभ देणेत येईल. ५. सदरची शैक्षणिक अर्थसहाय्य योजना ही इ. १० व इ.१२ वी नंतर शासनमान्य/विद्यापीठाकडून मान्यता मिळालेल्या संस्थेत प्रवेश घेतलेल्या पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांकरीताच आहे.
२	लोकशाहिर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजना	

उपरोक्त योजनेचे अर्ज भरण्याची सुविधा दि. १७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून सुरुवात करणेत येत असून दि. १७/०८/२०२६ ते दि. ३१/१२/२०२६ या कालावधीमध्ये ऑनलाईन पद्धतीने dbt.pmc.gov.in या संकेतस्थळावर भरणेत यावेत. दि. ३१/१२/२०२६ रोजी सायं. ०५.३० वा. संकेतस्थळावर अर्ज भरणेची सुविधा बंद करणेत येईल.

अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणेकरीता सूचना खालीलप्रमाणे.

१) नागरिकांनी यापूर्वी संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन केले असल्यास त्याच user id व password ने अर्ज भरावा. तसेच नवीन नागरिक असल्यास नविन रजिस्ट्रेशन करून user id password च्या आधारे अर्ज भरावा.
२) मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांनी मागासवर्गीय कल्याणकारी योजना व खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांनी युवक कल्याणकारी योजने अंतर्गत अर्ज भरणे आवश्यक आहे.
३) अर्ज पालकांच्या नावे भरणे आहे.
४) संकेतस्थळावर नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसार मूळ (Original) कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे!
५) dbt.pmc.gov.in या संकेतस्थळावर महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेबाबतचा नमुना (हमीपत्र) उपलब्ध करुन देणेत आला आहे. त्यानुसार माहिती पालक व प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयांनी भरल्यानंतरच सदरचे हमीपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
६) सदर योजनेचा लाभ घरातील एकाच लाभार्थ्याला घेता येईल.
७) शैक्षणिक अर्थसहाय्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असणे आवश्यक आहे.
८) अटी व नियमांप्रमाणे भरलेल्या अर्जांचा विचार केला जाईल. तसेच नाकारणेत आलेल्या अर्जाबाबत अर्जदाराने दिलेल्या मुदतीमध्ये आक्षेप पुर्तता केल्यास सदर अर्जावर पुढील कार्यवाही केली जाईल. मुदतीमध्ये आक्षेप पुर्तता न केल्यास अर्ज पूर्णतः रद्द करणेत येईल.
९) अर्ज भरताना अर्जदाराने अर्ज हा save as draft मध्ये तसाच ठेवल्यास व सदरचा अर्ज सादर (Submit) न केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची राहिल. यासाठी कोणत्याही प्रकारची सूचना देण्यात येणार नाही.
१०) अर्जदाराने अर्ज सादर केल्यानंतर अर्जाबाबतची सद्यस्थिती लॉगिनद्वारे जाणून घेण्याची जबाबदारी नागरिकांची राहील.
११) तसेच याबाबत अधिक माहिती हवी असल्यास पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयामध्ये असलेल्या समाज विकास विभागाकडील कर्मचारयांकडे संपर्क साधावा.
१२) सदर योजने बाबतचा संपुर्ण तपशील तसेच अटी व शर्ती पुणे महानगरपालिकेच्या dbt.pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. 18001030222 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

सही/–
(नवलकिशोर राम)
महापालिका आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

सही/–
(मंजुषा नागपुरे)
महापौर
पुणे

जाहिरात क्र.५२९,दि.०७/०८/२०२६

पुणे महानगरपालिका, पुणे

"जाहीर आवाहन"

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेसाठी पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी तडजोडीने जागा खरेदी करणेबाबत.

सद्यःस्थितीत नव्याने समाविष्ट ३२ गावांपैकी नांदेड, किरकिटवाडी, नांदोशी, नऱ्हे, सणसनगर, खडकवासला, धायरी, जांभूळवाडी, कोळेवाडी, मांगडेवाडी, गुजर निंबाळकरवाडी व भिलारेवाडी या गावांमध्ये पाणीपुरवठा प्रकल्पासाठी जागांची आवश्यकता आहे.

सदर पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध ठिकाणी आवश्यक पाणीपुरवठा सुविधांसाठी योग्य जागेची आवश्यकता आहे. तांत्रिकदृष्ट्या योग्य जागा खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत.

संबंधित खाजगी विकसक/जमीनमालक यांनी स्वेच्छेने आवश्यक जागा पुणे महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यासाठी आपले प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या जागा तक्त्यामधील जागा किंवा त्यालगतच्या जागेचे मालक देखील प्रस्ताव दाखल करू शकतात.

अ. क्र.	गावाचे नाव	स. नं.	लगतची खूण	अंदाजित क्षेत्र चौ. मी.
१	खडकवासला	३०	खडकवासला धरणाच्या उजव्या बाजूस	३११६
२	खडकवासला	३४	हनुमान मंदिराजवळ	१२२५
३	खडकवासला	३१	खडकवासला धरणाच्या उजव्या बाजूस	२५१६
४	खडकवासला	२६	खडकवासला धरणाच्या उजव्या बाजूस	६७६
५	किरकिटवाडी	५३८	किरकिटवाडी कोल्हेवाडी वॉकिंग एरिया	८४१
६	किरकिटवाडी	१९६	डीएसके आनंदघन प्रोजेक्टजवळ	१२२५
७	धायरी	१०५	निसर्ग हाईटच्या बाजूला	१२२५
८	धायरी	८०	मिन्सन कूलिंग टॉवरजवळ	५७६
९	धायरी	७८	मिन्सन कूलिंग टॉवरजवळ	८४१
१०	धायरी	६९	मेघा इंजिनियरिंग इन्फ्रास्ट्रक्चर एलटीडी एडिट-२ च्या जवळ	८४१
११	धायरी	३४	गुरुदत्त निवासजवळ	१०२४
१२	धायरी	७७	खंडोबा हिल्सजवळ	६७६
१३	नांदोशी	१६	चौधरी फॉर्महाउसजवळ	५२९
१४	सणसनगर	२९	ग्रीन ग्रो गार्डन डेव्हलपर्सजवळ	४८४
१५	सणसनगर	४३/४	मनन आश्रमाजवळ	४८४
१६	नांदोशी	११	अगस्ती फार्मास्युटिकल्सजवळ	४००
१७	नांदोशी	१३६	वडजाईमाता मंदिराजवळ	६७६
१८	नांदोशी	३६	प्रॉफिट्स टेक्नोलॉजीसजवळ	५७२
१९	नांदोशी	३	अंगणवाडी नांदोशीजवळ	१०२४
२०	नांदोशी	१५९	घुले दरा हायकिंग पॉइंटजवळ	६७६
२१	नऱ्हे	९	अंबाबाई टेंपलजवळ	१५९६
२२	नऱ्हे	१९	श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिराजवळ	१२२१
२३	आंबेगाव खु.	६६	सच्चाईमाता मंदिर टेंपलजवळ	६७६
२४	मांगडेवाडी	५	होटल हिलटॉपजवळ	६७६
२५	भिलारेवाडी	१२	स्काईबोट इन्फ्राजवळ	४८४
२६	भिलारेवाडी		आर्यन्स कमांडो ट्रेनिंग कॅम्प धनावडेनगर	६७६
२७	निंबाळकरवाडी	२१	सरहद ग्लोबल स्कूल और ज्युनियर कॉलेजजवळ	६७६.००
२८	निंबाळकरवाडी	१०	गुजरवाडी क्रिकेट ग्राउंडजवळ	९६१.००
२९	निंबाळकरवाडी	२१	सरहद ग्लोबल स्कूल और ज्युनियर कॉलेजजवळ	६७६.००
३०	मांगडेवाडी	३	नवलाई पार्कजवळ	९६१.००
३१	मांगडेवाडी	१	सूर्योदय याईस प्राइवेट लिमिटेडजवळ	१०२४.००
३२	मांगडेवाडी	१९	नवलाई पार्कजवळ	९६१.००
३३	नऱ्हे	५७	गोल्ड इम्बरजवळ	९००.००
३४	नऱ्हे	१५	साई रेसिडेन्सीजवळ	१८९०.००
३५	नऱ्हे	४३	देवांशी कॉम्प्लेक्सजवळ	१०२४.००
३६	जांभूळवाडी	६७	श्री वीरालयम् जैन मंदिर रोड	१०२४.००
३७	कोळेवाडी	११	श्री वाघजाई टेंपलजवळ	६७६.००

सदरचे प्रस्ताव हे अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा) प्रकल्प, स्वा. वीर सावरकर भवन, बालगंधर्व रंगमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, पुणे- ४११००५ येथे किंवा punewsproject@punecorpoartion.org येथे सादर करावेत. सदर प्रस्तावांपैकी तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रस्तावातील जागांचे शासकीय नियमानुसार मूल्यांकन करण्यात येईल. सदर मोबदला संबंधित कायदेशीर जागामालकांना मान्य असल्यास सदर जागा पुणे महानगरपालिकेकडून खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(नंदकिशोर जगताप)
मुख्य अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/५३०
दि. ०७/०८/२०२६